खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२–२३

### राष्ट्रीय सेवा योजना विभाग : प्लास्टिक कचरा संकलन दिन

संक्षिप्त



राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता अभियान घेण्यात आले.

**राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता**

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत १९ ऑक्टोबर हा प्लास्टिक कचरा संकलन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या विभागातील स्वयंसेवकांनी खेड बसस्थानक, राजगुरू स्मारक, सिद्धेश्वर मंदिर, पुणे-नाशिक रोड लगतच्या परिसरातून सुमारे २० किलो प्लास्टिकचा कचरा संकलित केला. राजगुरुनगर नगरपरिषदेच्या माध्यमातून या कचऱ्याची योग्य व सुरक्षितरीत्या विल्हेवाट लावण्यात आली. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे म्हणाले, प्लास्टिक वर्गीय कचरा हा अविघटनशील स्वरूपाचा असून, प्लास्टिकमुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होतो. आजच्या उपक्रमामुळे संकलित झालेल्या कचऱ्यातून पर्यावरण निकोप स्वरूपाचे व प्रदूषणरहित होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांनी पर्यावरण जागृती, पर्यावरण संवर्धन याकडे केवळ उपक्रम म्हणून न पाहता चळवळ म्हणून पाहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, डॉ. कीर्ती नितनवरे यांसह प्रा. सोनल धानापुणे, प्रा. जयश्री गोगावले, व प्रा. प्राची शिंदेकर यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभागप्रमुख